"सानेगुरुजींनी महाराष्ट्राला आदर्श आई दिली आणि डॉ. नरेंद्र जाधव यांनी महाराष्ट्राला दिला आदर्श बाप!"

- निळू फुले

१७१ वी आवृत्ती !

# आमचा बाप आन् आम्ही

सदाशिव पाटील क्षीरसागर

डॉ. नरेंद्र जाधव

Scanned by CamScanner

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे
अस्मिता जागृत झालेल्या एका कुटुंबाची ही कहाणी.

आमच्या आई-वडिलांनी आम्हाला जन्म दिला असला
तरी माणूस म्हणून,
त्यांना व आम्हाला जगण्याचा हक्क मिळवून दिला
तो सर्वस्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी
आणि म्हणूनच तर
या यशोगाथेचे मूकनायक आहेत ते,
व्यापक अर्थाने आम्हा सर्वांचे 'बाप' असलेले
परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर!

Scanned by CamScanner

सदाशिव पाटील
क्षीरसागर
कडवंची

डॉ. नरेंद्र जाधव

# आमचा बाप आन् आम्ही

Scanned by CamScanner

‘आंधळ्या’ राहीआजीच्या ‘दूर’दृष्टीस,
‘अशिक्षित’ दादांच्या बौद्धिक प्रगल्भतेस, आणि
आई ‘सोना’बाईच्या वाट्याला आलेल्या
‘गरिबी’च्या चटक्यांस...

Scanned by CamScanner

## ‘आमचा बाप आन् आम्ही’:
## नाबाद १,६०,०००!

वाचन संस्कृती लोप पावत असल्याची ओरड होत असल्याच्या या काळात जिथे,

- एखाद्या पुस्तकाची १००० प्रतींची आवृत्ती दोन वर्षांत विकली गेली तर ते पुस्तक यशस्वी झालं असं मानण्यात येतं.
- पंधरा–वीस आवृत्त्या निघाल्या म्हणजे आकाशाला हात लागले असं वाटतं आणि
- एखाद्या पौराणिक कथेवर आधारित कादंबरीच्या पन्नास वर्षांत तीस–पस्तीस आवृत्या निघाल्या तर वर्तमानपत्रांतून अग्रलेख लिहिले जातात.

त्याच सध्याच्या काळात,

- एखाद्या मराठी पुस्तकानं देशी–विदेशी १७ भाषांमध्ये अनुवादित होऊन जगभरात केवळ वीस वर्षांत तब्बल ६ लाख प्रती विकल्या जाण्याइतके घवघवीत यश मिळवावे;
- अमेरिकेत ते पुस्तक लिलाव बोलीनं विकलं जावं आणि त्यातून ॲडव्हान्स रॉयल्टी म्हणून लेखकाला ४० लाख रुपये मिळावेत, आणि
- सर्व देशी–विदेशी भाषांमधल्या प्रकाशनातून लेखकाला एक कोटी रुपयांपेक्षा जास्त रॉयल्टी मिळावी.

हे कोणाला सांगून तरी खरं वाटेल काय?

हा चमत्कार घडवला आहे तो, ‘आमचा बाप आन् आम्ही’ या पुस्तकानं!

‘आमचा बाप आन् आम्ही’ २ डिसेंबर १९९३ रोजी प्रसिद्ध झाले आणि प्रकाशनाच्या दिवशीच एक हजार प्रतींची पहिली आवृत्ती संपून जाण्याची मराठी साहित्यामध्ये अशक्यप्राय समजली जाणारी घटना घडली. त्यानंतर आवृत्ती मागून आवृत्तीचा ओघ अव्याहतपणे चालू राहिला आहे. विशेष म्हणजे हा वेग चढत्या

Scanned by CamScanner

क्रमाने गेली वीस वर्षे कायम राहिला आहे आणि आता तर दर महिन्याला किमान एक आवृत्ती अशा वेगाने 'आमचा बाप आन् आम्ही' मराठी वाचकांमध्ये पसरत आहे. महाराष्ट्रात तर वाचणारं असं एकही घर नसेल की जिथे 'आमचा बाप आन् आम्ही' पोहोचलेले नाही. आजपर्यंत मराठीत १ लाख ६० हजार प्रती विकल्या गेल्या आहेत. ही १६१वी ऐतिहासिक आवृत्ती!

'आमचा बाप'मुळे गेल्या दहा वर्षांत मला एक कोटी रुपयांचे मानधन मिळाले, हेही सौजन्य बाजूला ठेवून, यानिमित्ताने सांगावेसे वाटते. (त्यामुळेच तर २००६ साली अफगाणिस्तानातली वर्षाकाठी सव्वा कोटी रुपये देणारी नोकरी सोडून ९०-९५ टक्के वेतन कपात स्वीकारून पुणे विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून येणे मला शक्य झाले.) नव्या उमेदीच्या मराठी लेखकांसाठी ही बाब नक्कीच आशादायी ठरावी.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गावरील पथिक अशा आम्हा जाधव कुटुंबातील सदस्यांच्या यशस्वी संघर्षाची ही कहाणी सच्च्या दिलाने मांडण्याचा मी प्रयत्न केला. लेखक म्हणून समाजाच्या सर्व स्तरातील मराठी वाचकांच्या घराघरात मला स्थान मिळाले, याचा आनंद शब्दातीत आहे. जोपर्यंत 'आई-बापा'च्या श्रद्धेभोवती आपली संस्कृती केंद्रीत आहे, तोपर्यंत 'आमचा बाप' घराघरात वाचले जाईल, यात तिळमात्र शंका नाही. आज १६१व्या आवृत्तीनंतरही हा विश्वास मनात पक्का आहे.

कोणतेही काम करताना त्याच्यात 'टॉपला' जाण्याची प्रेरणा देणाऱ्या आमच्या बापाभोवती केंद्रीत असलेल्या या पुस्तकाला मराठी वाचकांनी साहित्य संस्कृतीत 'टॉपला' नेलं. 'आमचा बाप'ला मिळालेल्या अफाट प्रतिसादामुळे आणि लोकप्रियतेमुळे आम्ही सारे जाधव कुटुंबीय भारावून गेलो आहोत. व्यक्तीशः मला केलेल्या परिश्रमाचे चीज झाल्याचे समाधान तर वाटतेच, परंतु त्याबरोबरच वाचकांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांमुळे नव्या जबाबदारीची जाणीवदेखील निर्माण झाली आहे. हे पाथेय सोबत घेऊन, सामाजिक भान सतत जागृत ठेऊन, पुढील वाटचाल करायची आहे. यापुढेदेखील वाचक 'आमचा बाप आन् आम्ही'वर आणि पर्यायाने लेखक म्हणून माझ्यावर असंच उदंड प्रेम करीत राहतील, हा आशावादच नवनव्या लिखाणाची मला सतत प्रेरणा देत राहील.

माझ्या तमाम मराठी वाचकांना माझा कृतज्ञतेचा सलाम!

**– डॉ. नरेंद्र जाधव**

नवी दिल्ली
२८ मे २०१३

Scanned by CamScanner

# डॉ. नरेंद्र जाधव: परिचय

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव सध्या केंद्रीय नियोजन आयोग (अध्यक्ष : डॉ. मनमोहन सिंग) तसेच राष्ट्रीय सल्लागार परिषद (अध्यक्षा : श्रीमती सोनिया गांधी) या दोन शिखर संस्थांचे सन्माननीय सदस्य आहेत. सामाजिक बांधीलकीचा वसा घेतलेले नामवंत शिक्षणतज्ज्ञ, मराठी व इंग्रजीतले सिद्धहस्त लेखक; तसेच एक प्रसन्न व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ते सर्वदूर परिचित आहेत.

दलित समाजात जन्म आणि दारिद्र्य यांमधून येणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीवर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने निग्रहपूर्वक मात करत, (लहानपणी मुंबईच्या बकाल वस्तीत 'दादा' होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या!) छोट्या नरेंद्रने बाबासाहेबांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून गरुडभरारी घेतली आणि आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रांत एक 'दादा' माणूस म्हणून आज त्यांची गणना होते. ओजस्वी व प्रासादिक वाणी, खळाळणारे चैतन्य, अखंड ऊर्जा आणि आपल्या सकारात्मक चिंतनातून प्रबोधन करणारे अभ्यासू वक्ते म्हणून डॉ. नरेंद्र जाधव यांना अमाप लोकप्रियता लाभली आहे. त्यांचा थक्क करणारा जीवनप्रवास अनेकांसाठी - विशेषतः तरुणाईसाठी - दीपस्तंभ ठरला आहे आणि अजूनही ठरतो आहे. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी डॉ. नरेंद्र जाधव यांना आदर्श व्यक्तिमत्त्व (Role Model) म्हटले आहे.

मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात एम.ए.ला प्रथमवर्ग मिळवणारे डॉ. नरेंद्र जाधव हे पहिलेच दलित विद्यार्थी. पुढे १९८६ साली अमेरिकेच्या इंडियाना विद्यापीठातून, 'सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय विद्यार्थी' म्हणून विशे

Scanned by CamScanner

बहुमानासह अर्थशास्त्रातील डॉक्टरेट. डॉक्टरेट करत असताना, अमेरिकेतील इंडियाना आणि डिपॉ या दोन विद्यापीठांत अध्यापन करून विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून गौरव प्राप्त. अमेरिकेत डॉक्टरेट मिळाल्यानंतर अनेक संधी हात जोडून उभ्या असताना त्या डावलून मायभूमीचे ऋण फेडण्यासाठी एका आठवड्यातच भारतात परत.

स्टेट बँक ऑफ इंडियात अधिकारी म्हणून १९७४ ते १९७७ अशी तीन वर्षे आणि १९७७ पासून रिझर्व्ह बँकेत अर्थतज्ज्ञ म्हणून तब्बल ३१ वर्षे नोकरी. रिझर्व्ह बँकेचे प्रधान आर्थिक सल्लागार आणि प्रमुख अर्थतज्ज्ञ म्हणून कार्यकारी संचालकाच्या पदावरून स्वेच्छानिवृत्ती. भारतीय अर्थकारण आणि आर्थिक धोरणांच्या संदर्भात गेली कित्येक वर्षे महत्त्वपूर्ण योगदान. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) या जागतिक वित्तसंस्थेमध्ये साडेचार वर्षे आर्थिक सल्लागार म्हणून भारताचे प्रतिनिधित्व, त्याचप्रमाणे इथियोपिया व अफगाणिस्तान यांसारख्या मागास देशांच्या अर्थव्यवस्थांची पुनर्बांधणी करण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी.

डॉ. नरेंद्र जाधव शिक्षणक्षेत्राला सामाजिक परिवर्तनाचे तीर्थक्षेत्र मानतात म्हणूनच वर्षाकाठी सव्वा कोटी रुपयांच्या नोकरीचा त्याग करून (तब्बल ९० टक्के वेतनकपात स्वीकारून!) २००६ साली त्यांनी पुणे विद्यापीठाचे कुलगुरुपद स्वीकारले. तेथील त्यांची तीन वर्षांची कारकिर्द अत्यंत यशस्वी ठरली. समर्थ भारत अभियानाच्या माध्यमातून पुणे विद्यापीठ समाजाभिमुख करण्यात आणि पुणे विद्यापीठाला शिक्षण व संशोधनात जागतिक पातळीवर नेण्यात डॉ. नरेंद्र जाधवांचा सिंहाचा वाटा आहे.

डॉ. नरेंद्र जाधव यांनी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांवर आजवर एकूण २७ अहवाल केंद्रसरकार, राज्यसरकार आणि रिझर्व्ह बँक यांना सादर केले आहेत. अलीकडच्या काळात डॉ. जाधवांनी लिहिलेले अनेक अहवाल महत्त्वपूर्ण ठरलेले आहेत. या संदर्भात 'महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या' संबंधीचा अहवाल, राष्ट्रीय कौशल्यविकास योजनेबद्दलचा अहवाल, 'फॅक्टरीज् अॅक्ट' संबंधीचा अहवाल, अनुसूचित जाती-जमाती 'सबप्लॅन' -बद्दलचा अहवाल, तसेच, भटक्या-विमुक्त जातींसंबंधीचा अहवाल हे विशेष लक्षणीय आहेत. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी नेमलेल्या उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष म्हणून दोन ऐतिहासिक महत्त्वाचे अहवाल त्यांनी केंद्रसरकारला नुकतेच सादर केले आहेत. ते म्हणजे २६ अलिपूर रोड या डॉ. आंबेडकरांच्या

Scanned by CamScanner

दिल्लीतील एके काळच्या निवासस्थानी डॉ. आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्यासंबंधीचा 'मास्टर प्लॅन' आणि नवी दिल्लीत १५ जनपथ या मोक्याच्या ठिकाणी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर फॉर सोशल जस्टिस' या संस्थेची उभारणी करण्यासाठीचा मास्टर प्लॅन. या दोन्ही अहवालांवर केंद्र सरकारची कार्यवाही सुरू झाली आहे.

डॉ. नरेंद्र जाधव यांच्या मराठी आणि इंग्रजी लेखनाचा झपाटा विलक्षण म्हणावा लागेल. त्यांचे आर्थिक, सामाजिक आणि ललित विषयांवरचे एकूण २२ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्याशिवाय २०० पेक्षा जास्त शोधनिबंध व स्फुट लेख, २७ महत्त्वपूर्ण शासकीय अहवाल आणि रिझर्व्ह बँकेच्या अनेक गव्हर्नरांसाठी लिहिलेली १०० पेक्षा अधिक भाषणे असा त्यांचा लेखनाचा विस्तृत पट आहे. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या प्रकाशित (लिखित आणि संपादित) ग्रंथांची एकूण पृष्ठसंख्या होते तब्बल १०,०००!

मराठी साहित्यात एकजात सारे विक्रम मोडून काढणाऱ्या 'आमचा बाप आन् आम्ही' या त्यांच्या पुस्तकाचा आजवर भारतीय आणि परदेशी अशा २० भाषांमध्ये अनुवाद झाला (किंवा होत) असून, त्याच्या सुमारे सहा लाखांहून अधिक प्रती जगभर विकल्या गेल्यामुळे हे पुस्तक मराठी भाषेतला चमत्कार मानले जाते. 'सानेगुरुजींनी महाराष्ट्राला आदर्श आई दिली आणि डॉ. नरेंद्र जाधव यांनी महाराष्ट्राला दिला आदर्श बाप!' अशा शब्दांत ज्येष्ठ कलावंत निळू फुले यांनी ह्या पुस्तकाचा गौरव केला होता. मराठी साहित्याच्या इतिहासातील सर्वाधिक लोकप्रिय आत्मकथन म्हणून गाजलेल्या या पुस्तकाची तब्बल १६१वी आवृत्ती त्यांच्या षष्ट्यब्दीपूर्तिनिमित्ताने (२८ मे २०१३) नुकतीच प्रकाशित झाली!

रवींद्रनाथ टागोर यांच्या दीडशेव्या जयंती वर्षात, ८ मे २०११ रोजी, त्यांनी संपादन-अनुवाद केलेली 'रवींद्रनाथ टागोर समग्र : जीवनदर्शन' ही ग्रंथत्रयी प्रकाशित झाली. त्यात आहे 'भयशून्य चित्त जेथ' हा रवींद्रनाथांच्या १५१ कवितांचा भावानुवाद, 'रवींद्रनाथ टागोर : समग्र साहित्यदर्शन' हा संपादित ग्रंथ आणि 'रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव' हे गुरुदेवांचे मराठीतले पहिलेच विश्लेषणात्मक चरित्र. या तीन ग्रंथांनी प्रथमच मराठी वाचकाला रवींद्रनाथांची सर्वस्पर्शी ओळख करून दिली. या ग्रंथत्रयीलादेखील चोखंदळ वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. वर्षभरात चार आवृत्त्या निघाल्या!

Scanned by CamScanner

आजपर्यंत राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय स्वरूपाच्या तब्बल ६१ पुरस्कारांनी डॉ. नरेंद्र जाधव सन्मानित झाले आहेत. त्यांतला अतिविशेष पुरस्कार म्हणजे 'कमांडर ऑफ अॅकेडेमिक पाल्मस' हा फ्रान्स सरकारचा सर्वोच्च नागरी किताब, जो मिळवणारे डॉ. नरेंद्र जाधव हे पहिलेच भारतीय होत. अलीकडेच भारतातील चार राज्यांतील विद्यापीठांनी त्यांना 'डॉक्टर ऑफ लेटर्स' किंवा D. Litt यांसारख्या मानद पदव्या प्रदान केल्या आहेत.

डॉ. नरेंद्र जाधव आणि वसुंधरा जाधव या दांपत्याच्या कुटुंबात आहेत मुलगी अपूर्वा, मुलगा तन्मय, सून केजल व नातू अगस्त्य. अपूर्वा 'डेमॉग्राफी' या विषयात अमेरिकेतील सुप्रसिद्ध पेनसिल्व्हानिया विद्यापीठात पीएच.डी. साठी संशोधन करत आहे, तर तन्मय फायनान्सच्या क्षेत्रात 'डिलॉइट' या जगविख्यात बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये व्हाइस प्रेसिडेंट म्हणून व केजल फार्मसीच्या क्षेत्रात 'अॅनालिस्ट' म्हणून हैदराबाद येथे कार्यरत आहेत.

पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी २००५ साली आपल्या जाहीर भाषणात म्हटले, की 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. के. आर. नारायणन् यांच्याप्रमाणेच डॉ. नरेंद्र जाधव यांचे आयुष्य हीसुद्धा बदलाची, असीम शौर्याची, उत्कर्षाची आणि आशेची कहाणी आहे. यामधून आपल्या देशातील लाखो-करोडो लोकांना नवे, सुखासमाधानाचे जीवन जगण्यासाठी लढा देण्याचे स्फुरण मिळेल याची मला खात्री वाटते.'

डॉ. जाधवांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी पुढील वेबसाइटला भेट द्यावी: www.drnarendrajadhav.info

Scanned by CamScanner

# डॉ. नरेंद्र जाधव यांची ग्रंथसंपदा

१. **Dr. Ambedkar Speaks :**
301 Seminal Speeches (edited, 2013)
A Trilogy released on March 08, 2013, combined size: 1600 pages
(Konark Publishers, New Delhi)

- **Vol. I** : Introduction, Autobiographical Speeches, Guidance to Followers and Complete Bibliography
- **Vol. II** : Social, Economic, Religion, Law and Constitution
- **Vol. III** : Political Speeches

४. **बोल महामानवाचे** : (डॉ. आंबेडकरांची ५०० मर्मभेदी भाषणे)
ग्रंथत्रिवेणी (संपादित), तीन खंडांची एकूण पृष्ठसंख्या १७०० +
(ग्रंथाली, मुंबई, २४ ऑक्टोबर २०१२, धम्मचक्रप्रवर्तन दिन)

- **खंड पहिला** : आत्मनिवेदनपर भाषणे, अनुयायी मार्गदर्शन व डॉ. आंबेडकरांच्या भाषणांची समग्र सूची
- **खंड दुसरा** : सामाजिक, आर्थिक आणि कायदा-संविधानविषयक भाषणे
- **खंड तिसरा** : राजकीय भाषणे

७. **रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव** : (ग्रंथाली, मुंबई, मे २०११, पृष्ठसंख्या ३९२)

८. **रवींद्रनाथ टागोर : समग्र साहित्यदर्शन** : (ग्रंथाली, मुंबई, मे २०११, पृष्ठसंख्या ३२८)

Scanned by CamScanner

९. **भयशून्य चित्त जेथ... रवींद्रनाथांच्या १५१ प्रातिनिधिक कविता :** (ग्रंथाली, मुंबई, नोव्हेंबर २०१०, पृष्ठसंख्या ४५६)

- प्रकाशनाच्या दिवशी संपूर्ण आवृत्ती विकला गेलेला मराठी भाषेतील (बहुधा) पहिलाच कवितासंग्रह.
- भयशून्य चित्त जेथ... या पुस्तकास आपटे वाचनालयाच्या वतीने दिला जाणारा 'इंदिरा संत पुरस्कार', सन २०११.
- रवींद्रनाथ टागोर : समग्र जीवनदर्शन या ग्रंथत्रयीस पुणे मराठी ग्रंथालयाचा 'ना. ह. आपटे स्मृती पुरस्कार', सन २०११.

१०. **UNTOUCHABLES: My Family's Triumphant Journey Out of the Caste System in Modern India,** (California University Press, USA 2007 and Simon and Schuster, USA, 2005; पृष्ठसंख्या 307)

- अमेरिकेत लिलाव बोलीने विकले गेलेले पहिलेच भारतीय भाषांमधून आलेले पुस्तक.

११. **MONETARY POLICY, FINANCIAL STABILITY AND CENTRAL BANKING in INDIA,** (Macmillan India Ltd, New Delhi, २००६; पृष्ठसंख्या 430).

१२. **RE-EMERGING INDIA: A Global Perspective,** (ICFAI University Press; Hyderabad, 2005 पृष्ठसंख्या 380).

१३. **OUTCASTE- A MEMOIR : Life and Triumphs of an Untouchable Family in India** (Penguin, India, 2003, पृष्ठसंख्या 283).

१४. **GOVERNORS SPEAK** (Edited) (Reserve Bank of India, 1997; पृष्ठसंख्या 350).

Scanned by CamScanner

१५. **CHALLENGES TO INDIAN BANKING : Competition, Globalization and Financial Markets** (Edited), (Macmillan India Ltd.) New Delhi, India, 1996; पृष्ठसंख्या 442).

१६. **C. D. DESHMUKH MEMORIAL LECTURES; Centenary Commemorative Volume** (Edited), (Reserve Bank of India, 1996; पृष्ठसंख्या 260).

१७. **MONETARY ECONOMICS FOR INDIA :** (Macmillan India Ltd. New Delhi, 1994; पृष्ठसंख्या 270).

१८. **आमचा बाप आन् आम्ही** : (ग्रंथाली, मुंबई, 1993, पृष्ठसंख्या : 209)

- प्रकाशनाच्या दिवशी संपूर्ण आवृत्ती विकले गेलेले मराठी भाषेतील बहुधा पहिले पुस्तक.
- (आजवर २० वर्षांत) तब्बल १६० आवृत्त्या प्रकाशित करण्याचा मराठी साहित्याच्या इतिहासातला अभूतपूर्व पराक्रम.
- देशी-विदेशी अशा एकूण २० भाषांमध्ये सर्व मिळून जवळजवळ ६ लाख प्रती विकले गेलेले विश्वविक्रमी पुस्तक.
- 'साहित्य अकादमी' पुरस्कार (पंजाबी अनुवादासाठी) प्राप्त.

१९. **OUR FATHER AND US** (Children's Edition in Korean), Gimmyyoung Publisher, Korea, (2009, 170 Pages).

२०. **डॉ. आंबेडकर : आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान** : (सुगावा प्रकाशन, पुणे १९९२, पृष्ठसंख्या : ११८).

२१. **DR. AMBEDKAR: Economic Thought and Philosophy** (Popular Prakashan, Bombay, 1992; पृष्ठसंख्या : 109).

२२. **MACROECONOMIC INVESTMENT MANAGEMENT IN LDCs: A Social Cost Benefit Approach** (Indiana University, USA, 1986; पृष्ठसंख्या : 240).

Scanned by CamScanner

## डॉ. नरेंद्र जाधव यांना मिळालेले विविध पुरस्कार

१. **'महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०१३'**, महाराष्ट्र गुजराती समाज, मुंबई (२५ मे २०१३)

२. **'चैतन्यदीप पुरस्कार'**, रोटरी क्लब ऑफ पर्वती, पुणे (एप्रिल ०७, २०१३)

३. **'महर्षी वाल्मीकी राष्ट्रीय सम्मान'**, चंपारण सांस्कृतिक महोत्सव समिती, मोतिहारी, बिहार (मार्च ०३, २०१३)

४. **'पुरुषोत्तम पुरस्कार'**, पी. के. अण्णा पाटील फाउंडेशन, शहादा (जि. नंदूरबार), महाराष्ट्र (ऑक्टोबर ०९, २०१२)

५. '**Distinguished Fellowship 2012 Award**', Institute of Directors, New Delhi (August 17, 2012)

६. **Maharashtra State 52nd Anniversary Award, Peoples' Art** Centre, Mumbai (May 1, 2012)

७. **'Honorary D.Litt'** by Karnataka State Open University (KSOU) Mysore, (April 4, 2012)

८. **'Honorary D.Litt'** by Kalinga Institute of Social Science (KISS), Bhubaneswar, (January 6, 2012)

९. **'ना. ह. आपटे स्मृती पुरस्कार'**, 'रवींद्रनाथ टागोर : समग्र जीवनदर्शन' या ग्रंथत्रिवेणीस पुणे मराठी ग्रंथालयाचा पुरस्कार, पुणे (डिसेंबर ७, २०११)

Scanned by CamScanner

१०. **'Thomas Hart Benton Mural Medallion'** President's Medal, Indiana University, USA (2011)

११. **'Commander of the Order of Academic Palmes'**, (Commander dans L'order des Palmes), Government of France (2011)

१२. **'इंदिरा संत पुरस्कार'**, 'भयशून्य चित्त जेथ', या अनुवादित ग्रंथास आपटे वाचनालय, इचलकरंजी येथील पुरस्कार (२०११)

१३. **'Honorary D.Litt'** by Dr. D. Y. Patil University, Pune - March 18, 2011

१४. **'Degree of Doctor of Letters (Honoris Causa)'** by Sido-Kanhu Murmu University, Dumka, Jharkhand – (March 26, 2011)

१५. **'Planner of the Year Award'** Journalist Federation of India, New Delhi (2011).

१६. **'Role –Model for India Award'** CMS, Delhi (2011)

१७. **'सावित्रीबाई फुले : फातिमा शेख पुरस्कार'**, शिक्षक भारती, मुंबई महाराष्ट्र (२०१०)

१८. **'संत देव मामलेदार यशवंत गौरव पुरस्कार'**, आय-न्यूज, सटाणा, नाशिक, महाराष्ट्र (जून, २०१०)

१९. **'Elite Award- Excellence in Financial Communication'**, by Association of Business Communicators of India, Mumbai (November, 2010)

२०. **'डॉ. भीमराव आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार'**, जीवक वेल्फेअर सोसायटी, नागपूर (जून, २०१०)

२१. **'डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मृती पुरस्कार'**, मारवाडी फाउंडेशन, नागपूर (जानेवारी, २०१०)

२२. **'गुरुवर्य शंकरराव कानिटकर स्मृती पुरस्कार'**, मॉडर्न एज्युकेशन ॲण्ड प्रोग्रेसिव्ह सोसायटी, पुणे (जानेवारी, २०१०)

२३. **'Jewel of Ruia Award'**, by Alumni Association of Ruia College, Mumbai (December, 2009)

२४. **'भारत शिरोमणी पुरस्कार'**, नवी दिल्ली (सप्टेंबर, २०१०)

Scanned by CamScanner

२५. **'राजीव गांधी स्मृती पुरस्कार'**, शिक्षणक्षेत्रातील अतुलनीय योगदानासाठी राजीव गांधी फाउंडेशनचा पुरस्कार, मुंबई (सप्टेंबर २००९)

२६. **'Excellence Award for Excellence in Education Field'**, by Top Management Consortium, Pune (April 2009).

२७. **'केसरी गौरव सन्मान'**, केसरी आर्ट अॅण्ड कल्चर फाउंडेशन, मुंबई (जानेवारी २००९)

२८. **'मनोहर शिक्षण रत्न पुरस्कार'**, मनोहर प्रतिष्ठान, (२००९)

२९. **'न्या. म. गो. रानडे पुरस्कार'**, राष्ट्रीय सामाजिक परिषद, पुणे (जानेवारी २००८)

३०. **'यशवंतराव चव्हाण पुरस्कार'**, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अहमदनगर (२००८)

३१. **'महात्मा फुले पुरस्कार'**, पुणे (२००८)

३२. **'नाशिक भूषण पुरस्कार'**, रोटरी इंटरनॅशनल, नाशिक (२००८)

३३. **'Adjunct Professor'**, Honour by XI'AN JIOTONG University, China (April 06, 2007)

३४. **'नेमिनाथ जैन पुरस्कार'**, पुणे (२००८)

३५. **'भारत ज्योती पुरस्कार'**, इंडिया इंटरनॅशनल सोसायटी, दिल्ली (२००७)

३६. **'श्रीमंत मालोजीराजे स्मृती पुरस्कार'**, मालोजीराजे स्मृती प्रतिष्ठान, फलटण, जि. सातारा (२००७)

३७. **'कृतज्ञता गौरव पुरस्कार'**, प्रीतिसंगम ज्ञानप्रबोधिनी संस्था, कराड (२००७)

३८. **'सामाजिक न्याय पुरस्कार'**, न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठान, कराड (२००७)

३९. **'स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार'**, रामकृष्ण-विवेकानंद इंटरनॅशनल फाउंडेशन, नवी दिल्ली (२००७)

४०. **'Vocational Excellence Award'**, by Rotary Club, Pune (2007).

Scanned by CamScanner

४१. 'नेताजी सुभाषचंद्र बोस साहित्य गौरव पुरस्कार', जयहिंद फाउंडेशन, सातारा (२००७)
४२. 'अभिनव भूषण पुरस्कार', अभिनव ग्लोबल फाउंडेशन, पुणे (२००७)
४३. 'Lions Club International Award', Mumbai (२००६)
४४. 'All India Association of MBAs Award', Pune (२००६)
४५. 'गुरुवर्य पुरस्कार', (लोकशिक्षण पुरस्कार) (२००६)
४६. "Vishwa-Setu Award" for International Peace and Harmony, Mumbai (2005).
४७. 'आमचा बाप आन् आम्ही', या आत्मचरित्राच्या पंजाबी आवृत्तीस 'साहित्य अकादमी पुरस्कार', नवी दिल्ली (२००५)
४८. 'सूर्यदत्त पुरस्कार', अर्थ व बँकिंग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी, पुणे (२००५)
४९. 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार', विविध क्षेत्रांतील अष्टपैलू योगदानासाठी दिला जाणारा पुरस्कार, मुंबई (२००४)
५०. 'सी. डी. देशमुख पुरस्कार', अर्थशास्त्रीय साक्षरतेसाठी दिला जाणारा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीचा पुरस्कार, मुंबई (१९९७)
५१. 'FIE Foundation National Award', for contribution to Indian culture, Ichalkaranji (1997).
५२. 'All India Publishers' Association Award for the book "Challenges to Indian Banking', New Delhi (1996)
५३. 'मुकादम पुरस्कार', 'आमचा बाप आन् आम्ही' या आत्मचरित्रास (१९९६)
५४. 'अस्मितादर्श पुरस्कार', 'डॉ.आंबेडकर : इकॉनॉमिक थॉटस् अॅण्ड फिलॉसॉफी', या पुस्तकास (१९९४)
५५. 'All India Publishers' Association Award for the book 'Monetary Economics for India', New Delhi (1994)
५६. 'डॉ. आंबेडकर : इकॉनॉमिक थॉटस् अॅण्ड फिलॉसॉफी', या पुस्तकास 'महाराष्ट्र साहित्य परिषद', पुणे येथील पुरस्कार (१९९३)

Scanned by CamScanner

५७. **'Award for Outstanding Contribution to Economic Theory'**, for the Ph.D. dissertation, Indiana University, USA (1986).

५८. **'Best International Student Award'** by Indiana University, USA (1983).

५९. **'National Scholar in Economics'** Ministry of Education and Culture, Government of India (1981-86).

६०. **'प्रथम पुरस्कार'**, महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा, रामनारायण रुइया कॉलेज, मुंबई (१९७२).

६१. **'कै. गो. ना. अक्षीकर जन्मशताब्दी पारितोषिक'** (द्वितीय क्रमांक तसेच मराठी व संस्कृत विषयातील विशेष प्राविण्याबद्दल), छबिलदास हायस्कूल, मुंबई (१९६९).

Scanned by CamScanner